स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या संशोधन प्रबंधाची रुपरेषा (Synopsis)

* संशोधन विषय *

'मध्ययुगीन मराठी संत साहित्यातील गुरुविचार : एक विवेचक अभ्यास'

* संशोधक *

रुपाली गुलाबराव मगर

* मार्गदर्शक *

प्रा. डॉ. राजाराम झोडगे

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख

नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी.

*** मध्ययुगीन मराठी संत साहित्यातील गुरुमहिमा : एक विवेचक अभ्यास**

प्रस्तावना :-

मराठी सकल संतसाहित्याचे अवलोकन करताना गुरुंच्या कृपा सामर्थ्याचे अलौकिकत्व ध्यानात येते. गुरुंची बरोबरी करणारी पृथ्वीलतावर एकही वस्तु नसुन प्रत्यक्ष ब्रम्ह ही तुलनेने फिके पडावे असे अनमोल स्थान संतसाहित्यात गुरुंना लाभले आहे. गुरु हा विषय संतांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा असून प्रसंगोपात्त उदारातुन तीव्रपणे झालेल्या अविष्कारातुन आपणास जाणवते. जे दृष्टीही न पाविजे असे दृष्टीशिवाय पाहण्याचे सामर्थ गुरुकृपेशिवाय लाभु शकत नाही असा सकल संतांचा सिध्दांत आहे.

आजच्या काळात लौकक ज्ञानाची साधने, माध्यमे खुप प्रमाणात प्रसारित झालेली आहेत. अनेक संदर्भग्रंथ, पुस्तके, रेडिओ, टिव्ही इ. प्रसार माध्यमांतून भौतिक ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया सुलभ झालेली आहे. ज्ञानाच्या विविध शाखा इतक्या संपन्न झालेल्या आहेत की एका शाखेचे ही संपुर्ण ज्ञान आपण पुर्णपणे आत्मसात करु शकत नाही. म्हणूनच अनुभव संपन्न अधिकारी व्यक्तीच्या सानिध्यातच हे ज्ञान घेणे आजही गरजेचे ठरते.

ज्ञानाची साधने वाढली म्हणुन गुरुंचे महत्व यत्किंचितही कमी होत नाही. शाळा महाविद्यालयात देखील अध्यापकांची नितांत गरज आहे. म्हणजे केवळ भौतिक साधने उपलब्ध असून केव्हाही भागणार नाही तर इथे देखील संतसाहित्याने अखिल विश्वातील मानवी जीवन सुखी संपन्न करण्यासाठी विश्वकल्याणाची कामना प्रकट केली आहे. संत वाङमयात गुरु या संज्ञेला खुपच महत्व आहे. सर्वच संतांनी गुरुंचा महिमा एका मुखाने वर्णिला आहे. संतांच्या सर्वच ग्रंथातून अगदी मनाने भारावुन त्यांच्या गुरुशिवाय ब्रम्ह जाणु शकत नाही. गुरुविना दुसरे ब्रम्ह नाही, हेच त्रिवार सत्य आहे. गुरुर्ब्रम्हा, गुरुर्विष्णु असेच आहे किंबहुना गुरुशिवाय आत्मज्ञान होऊच शकत नाही, अशा प्रकारची डोळस श्रध्दा संतमंडळींनी प्रखरतेने मांडली आहे.

मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, बहिणाबाई, मुक्ताई, जनाबाई, वेणाबाई, इत्यादी संतांच्या वाणीत अंत : करणपुर्वक गुरु विषयक बाबी, कथा प्रकटली

आहे. गुरु चे नाम घेतल्याशिवाय श्वासही घेऊ नये अशी परंपरा, श्रध्दा सकल संतांनी अनुभवातून प्रकट केली आहे.

मराठी भाषेला संपन्न करणारे संतांचे अभंग, कवन, स्तवन हे बहुतांश गुरु या विषयावर आहेत, किंबहुना असेही आहे की, गुरुउपदेशच मराठी भाषेतून काव्यरचना करण्यास प्रेरणा देत आहे. मराठी भाषेला लाभलेला अनमोल विषय गुरु हा असुन सुंदर रचना, मोहक भाषाशैली या संतांना गुरुमुळे करणे शक्य झाल्याचे संतांनी आपल्या काव्यातून मराठी भाषेला अनन्यसाधारण महत्व दिले त्या भाषेतील गुरु हा विषय अभ्यासणे आवश्यक ठरते. प्रत्येक संतांनी गुरु विषय कशासाठी मांडला हे अगदी विस्तृतपणे अभ्यासणे अगत्याचे ठरते.

*** मध्ययुगीन मराठी संत साहित्यातील गुरुविचार : एक विवेचक अभ्यास**

*** संशोधन विषयाचे महत्व :-**

मध्ययुगीन संत साहित्य गुरुदर्शनाने मंडित झालेले दिसुन येते. संत साहित्यातील गुरु स्वरुपाबद्दल आजवर फारच त्रोटक व अल्प स्वरुपात विचार मांडलेले दिसून येतात. डॉ. रा. चि. ढेरे यांनी संत साहित्य व लोकसाहित्य या ग्रंथात गुरु गौरवाचे गुढ या प्रकरणात गुरु सामर्थ शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. देशमुख स. रा. यांनी मराठी साहित्यशास्त्र (ज्ञानेश्वर ते रामदास) या प्रबंधात काव्यकारणमीमांसा करताना संत काव्याच्या आधारे गुरुभक्ती हे आवर्जुन सांगितले आहे. याशिवाय इतरत्र काही ग्रंथात गुरु विषयी अगदी त्रोटक विवेचन विखुरलेले दिसून येते.

त्यामुळे गुरु दर्शनाची चिकित्सा विस्तारीतपणे व एकत्रित स्वरुपात मांडणे मला अगत्याचे वाटते. संत साहित्याच्या आकलनातून हा विषय मांडणे आवश्यक, उद्‌बोधक व प्रेरक ठरणारा आहे. गुरुकृपा हीच संत साहित्याची स्फूर्ती व प्रेरणा आहे. या दृष्टीने प्रस्तुत संत साहित्यातील गुरुविचार हा प्रबंध विषय निवडला आहे.

*** संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी ज्या काही पध्दतींचा वापर करावयाचा आहे. त्यामध्ये ऐतिहासिक पध्दत, विश्लेषणात्मक पध्दत, वर्णनात्मक पध्दत, समाजशास्त्रीय पध्दत, भाषा वैज्ञानिक पध्दत तसेच उपयुक्त आणखी काही संशोधन पध्दतींच्या आधारे संशोधन करावयाचे आहे.

*** संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१) संत साहित्य निर्मिती मागील प्रेरणांचा शोध घेणे.

२) संत साहित्यातून आलेली गुरु ही संकल्पना समजुन घेणे.

३) संत साहित्यातुन आलेल्या गुरुमहिमेचा विवेचक अभ्यास करणे.

४) संतांच्या गुरुविचारांचे वेगळेपण अभ्यासणे.

५) संतांच्या गुरुविषयक साहित्याचे वाङ्मयीन विशेष, वेगळेपण अभ्यासणे.

*** प्रकरण रचना :-**

प्रकरण १	:-	विषय प्रवेश
प्रकरण २	:-	मराठी संत साहित्यातून आलेली गुरु ही संकल्पना
प्रकरण ३	:-	वारकरी संप्रदायातील संतांचा 'गुरुविचार'
प्रकरण ४	:-	महानुभव संप्रदायातील 'गुरुविचार'
प्रकरण ५	:-	इतर संप्रदायातील 'गुरुविचार'
प्रकरण ६	:-	वाङ्मयीन मुल्यमापन
प्रकरण ७	:-	उपसंहार

*** प्रकरण पहिले :- विषय प्रवेश**

मध्ययुगीन संत साहित्यामध्ये अनेक संप्रदायातील संतांनी काव्यरचना केलेली आहे.यामध्ये प्रामुख्याने गुरु प्रेरणा ही अग्रस्थानी असल्याचे दिसते. गुरु आज्ञेने केलेली ज्ञानेश्वरी लेखन हे सर्वश्रुत आहे. जवळपास सर्वच संतांनी गुरुला अनन्यसाधारण महत्व दिले आहे. गुरुचे अभंग मराठी भाषेत लिहून गुरु निष्ठा ही संतांच्या दृष्टीने महत्वाची असून प्रेरणास्थान गुरु आहे. या संतांच्या लेखनामागे विविध प्रेरणा होत्या त्यामध्ये गुरुचा उपदेश किंवा गुरु महती विशद करणे हा एक भाग होता. मध्ययुगीन काळात संतांनी अभंग, ओवी, भारुड, गौळण, श्लोक अशा विविध प्रकारामध्ये लेखन केले. या संतांचे मराठी साहित्यातील योगदान, त्यांच्या लेखनाचे विशेष व त्यांनी विविध सामाजिक अंगांना केलेला स्पर्श इ. चा विचार या प्रकरणात करावयाचा आहे.

*** प्रकरण दुसरे :- मराठी संत साहित्यातून आलेली गुरु ही संकल्पना**

गुरु या शब्दाचा अर्थ गुरु या शब्दाचा इतिहास, गुरु उत्पती विचार, व्याख्यासुत्र, गुरुचे निर्गुण सगुण रुप, गुरु तत्व काय आहे ? इ. चा अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

*** प्रकरण तिसरे :- वारकरी संप्रदायातील संतांचा गुरु विचार**

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतील सहावा व बाराव्या अध्यायामध्ये केलेले गुरु निरुपण, गुरुदर्शन, गुरुमहात्म्य, अध्यात्म्याच्या दृष्टीने सदगुरुंना दिलेले अढळ स्थान गुरुंची आवश्यकता का आहे ? या सर्व दृष्टीने विचार करावयाचा आहे.

श्री. एकनाथ यांनी उत्कृष्ट भारलेपणातून गुरुभक्तीला वटवृक्ष आपल्या लेखनातून उभा केलेला आहे. एकनाथ भागवतात पदोपदी गुरुभक्तीची झालर प्रकाशमान झालेली दिसून येते. त्यांची गुरुपरंपरा, सदगुरु स्वरुपाची विविध रुपे, दिशाहीन समाजापुढे पदोपदीने मांडलेला गुरुभक्ती आदर्श, विचार इ. बाबींचा सातत्याने अभ्यास करायचा आहे.

नामदेव व तुकारामांनी मांडलेल्या गुरु परंपरेविषयी मांडलेली मते, तुकोबाचे गुरु बद्दलचे क्रांतिकारक विचार, तुकारामाची गुरु - शिष्य संबंधाविषयी इतरांपेक्षा वेगळ्या प्रकारची भुमिका दिसून येते.

* प्रकरण चौथे :- महानुभव संप्रदायातील गुरु विचार

महानुभव संप्रदायातील गुरु विषयक विचारांचा अभ्यास ह्या प्रकरणात करावयाचा आहे. विवेकसिंध्दु, महंदबा, नागाईसा यांच्या गुरु निरुपणाची चिकित्सा करावयाची आहे.

* प्रकरण पाचवे :- इतर संप्रदायातील संतांचा गुरुविचार

समर्थ संप्रदायातील, गुरु महिमा, सदगुरुची लक्षणे रामदासांनी सदगुरु दर्शनाचे व्यापकत्व मांडले याची चिकित्सा करावयाची आहे.

नाथ संप्रदाय, नागेश संप्रदाय, सुफी, संप्रदायातील गुरुविचार यांचा सविस्तर आढावा घ्यावयाचा आहे.

तसेच संत कवयित्रींनीही काव्यातून गुरुदर्शन व्यक्त केले आहे. संत मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, वेणाबाई, सोयराबाई इ. स्त्री संत कवयित्रींनी त्यांच्या अभंगातून प्रकट झालेली गुरुभक्ती इ. सर्व मध्ययुगीन संत साहित्यातील गुरुविषयक विचार व महत्व यांचा वेध घेण्यात येईल.

* प्रकरण सहावे :- वाङ्मयीन मुल्यमापन

उत्कट गुरुभक्ती अंगी मुरलेल्या संतांच्या अनुभुतीपुर्ण उदगारातुन व्यक्त झालेल्या संतांच्या वाङ्मयीन शैलीचे आस्वादक विवेचन, भाषासौंदर्य, मराठी भाषेतील प्रतिमा, प्रतिकांचा, दृष्टांत यांचा वापर रसिक मनाला भुरळ पाडणारे अनुपम भाषा सौंदर्य प्राप्त करुन देणारे गुरु काव्य निर्मितीच्या संदर्भात अधिक प्रेरक कसे ठरले आहे हे या प्रकरणात मांडावयाचे आहे.

*** प्रकरण सातवे :- उपसंहार**

यात मागील प्रकरणांचा थोडक्यात आढावा घेऊन संशोधनातून संतांना गुरु हा विषय सहाय्यक, प्रेरक व मार्गदर्शक ठरला आहे. मध्ययुगीन संत साहित्यातून गुरुंचे महत्व स्पष्ट होते. प्रत्येक प्रकरणामध्ये गुरु विषयी संतांनी केलेला विचार, तसेच प्रत्येक प्रकरणातून हाती आलेले निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात समाविष्ट केले जातील. मराठी वाङ्मयाला संताची गुरु महिमा या विषयानुषंगाने लाभलेले अलौकिक व मौलिकता स्पष्ट केली जोईल.

टीप - (आवश्यकतेनुसार प्रकरणांमध्ये बदल केला जाईल)

* संदर्भ ग्रंथ सुची :-

१) ढेरे, रा. चि. :- संत साहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध प्रथमाकृती, श्री विद्याप्रकाशन, अष्टभुजा रस्ता पुणे २० जुलै १९७८.

२) पांगारकर, ल. रा. :- मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, मुंबई, १९६२

३) जोशी, डॉ. प्र. न. :- ज्ञानेश्वरांचे जीवनदर्शन, प्रसाद रौप्य महोत्सवी प्रकाशन, १९६२ पुणे.

४) कुलकर्णी, डॉ. दा. वि. :- एकनाथी भागवताचा अभ्यास, प्रथमाकृती प्रकाशक - अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे.

५) कोलते, वि. भि. :- लीळाचरित्र, द्वितीयावृत्ती, प्रकाशक - सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती, मंत्रालय, मुंबई. १९६२

६) जोशी, का. अ. (संपा.) :- संकलसंत गाथा भाग १/२ द्वितीयावृत्ती, श्रीसंत वाङ्मय प्रकाशन, पुणे, सदाशिव पेठ पुणे, १९६७.

७) तुळपुळे, डॉ. शं. गो. :- पाच संतकवी, द्वितीयावृत्ती, प्रकाशक - स. क्र. पाध्ये, व्हिनस प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे, जानेवारी १९६२.

८) जोशी, डॉ. व. स. :- महानुभाव संत प्रथमावृत्ती, प्रकाशक - मुकुंद नारायण भिडे, मॉडर्न बुक डेपो, बाजीराव रस्ता, पुणे. २० फेब्रुवारी १९६२.

९) दांडेकर, शं. वा. (संपा.) :- श्री ज्ञानेश्वरी : १२वा अध्याय द्वितीयावृत्ती, व्हिनस प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे १९६५.

१०) देव, शं. श्री. (संपा.) :- श्री रामदास आणि रामदासी संपादक : आत्माराम छापखाना, धुळे , ता. २६-०८-३५ शके १८५६.

११) पेंडसे, डॉ. शं. दा. :- साक्षात्कारी संत तुकाराम प्रथमाकृती कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे, १९६२.

१२) पोतदार, द. बा. :- बहीणाईची गुरुपरंपरा, भा.इ.स. मंडळ, वार्षिक इतिवृत्त, प्रकाशन - भा.इ.सं. मंडळ, पुणे इ. स. १९१५.

१३) बेंद्रे, वा. सी. :- तुकाराम महाराज यांची गुरुपरंपरा (राघवचैतन्य, केशव चैतन्य व बाबाजी) प्रथमावृत्ती, सप्टेंबर १९६०.

१४) भावे, विनोबा :- एकनाथांची भजने, आवृत्ती ६ वी, परंधाम प्रकाशन, वर्धा, १९६२.

१५) मोकाशी, पं. रा. :- महाराष्ट्रातील पाच संप्रदाय, प्रथमावृत्ती प्रसाद प्रकाशन, प्रकाशक - य. गो. जोशी, सदाशिव पेठ, पुणे, १९५४.

संशोधकाचे नांव	मार्गदर्शक
रुपाली गुलाबराव मगर	**प्रा. डॉ. राजाराम झोडगे** सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख नूतन महाविद्यालय, सेलू